# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

गुलटेकडी, पुणे ४११०३७

जा.क्र/प्रशा/२०२१/ 1872A                                        दि. १२/१०/२०२१

## परिपत्रक

प्रति,
सर्व विभागप्रमुख
विद्यार्थी व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी
टि.म.वि.पुणे

**विषय** - शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विविध अभ्यासक्रमांचे वर्ग ऑफलाईन पध्दतीने सुरू करणेबाबत
**संदर्भ**- पुणे महानगरपालिका आयुक्त कार्यालय जा.क्र मआ/साप्रवि/६०४९ दि. ९ ऑक्टोबर २०२१

वरील संदर्भीय आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागांतर्गत दिनांक १२ ऑक्टोबर २०२१ पासून ऑफलाईन वर्ग सुरू करण्यात येत आहेत.

कँपस उघडताना विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे आरोग्याची सुरक्षा यादृष्टीने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना तयार करण्यात आल्या आहेत त्याचे तंतोतत पालन सर्वांनी करावे.

१. सर्व विद्यार्थ्यांनी कोरोना प्रतिबंधक २ लशींचे डोस घेतल्याचे प्रमाणपत्र आपल्या विभाप्रमुखांकडे जमा करावे. तसेच हमीपत्र देखील भरून द्यावे.

२. सर्व विद्यार्थ्यांनी कँपसमध्ये प्रवेश करतेवेळी आपले ओळखपत्र परिधान करणे आवश्यक आहे. सर्व विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील केंद्रीय प्रवेश विभागातून नवीन ओळखपत्र घ्यावे.

३. सर्वानी Physical Distancing चे पालन करावे.

४. सर्वांनी मास्क वापरणे बंधनकारक आहे.

५. विद्यापीठाच्या आवारात कुठेही थूंकू नये

६. प्रत्येकाने स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्या आरोग्याची काही तक्रार जाणवल्यास किंवा वैयक्तिक समुपदेशाची आवश्यकता वाटल्यास त्वरीत विद्यापीठातील मदत कक्ष क्र.०२०-२४४०३०३६ यावर संपर्क साधावा

७. प्रत्येकाने आरोग्य सेतू अॅपचा वापर करावा.

प्रभारी कुलगुरू
टि.म.वि.पुणे.